**नि.दि.दा.क्र.४२३/२०१९**
**नि.क्र.३४**

वादी करीता सा.क्र.१

**<u>प्रतिवादी क्र.१ व २ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.टि.बी.शिंदे यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>**

१०. नि.दि.दावा क्र.१९४/२०१८ मध्ये हजर होऊन मी माझी लेखी कैफियत दिलेली आहे. नि.दि.दावा क्र.१९४/२०१८ मधील वादींनी त्यात मोजणी अर्ज दाखल केल्याचे मला माहित नाही. त्या अर्जानुसार भुमापन क्र.१६ व भुमापन क्र.१७ च्या जायमोक्यावर मोजण्या झाल्या होत्या हे मला माहित नाही. त्या मोजणी अर्जावरील आदेशान्वये जायमोक्यावर भुमापकाने नि.दि.दावा क्र.१९४/२०१८ मधील मिळकतीच्या हद्दी खुणा कायम केल्या होत्या हे म्हणणे खरे नाही. नि.दि.दावा क्र.१९४/२०१८ मध्ये, मोजणी अर्ज, मोजणी अहवाल व हद्दी खुणा निश्चिती अहवाल दाखल असल्याचे मला माहित नाही. नि.दि.दावा क्र.१९४/२०१८ मधील दाखल मोजणी अहवालानुसार प्रतिवादी यांची जमीन ओढयाच्या पूर्वेस असल्याचे निष्पन्न आहे हे मला माहित नाही. नि.दि.दावा क्र.१९४/२०१८ हा प्रतिवादी माझ्या शेतात येत होते म्हणून दाखल करण्यात आला होता. नि.दि.दावा क्र.१९४/२०१८ मधील मिळकत व आमची जमीन या मध्ये पाणंद रस्ता होता. त्या पाणंद रस्त्यालगत वादी संजय व दयानंद यांची जमीन आहे.

प्रश्न- संजय व दयानंद यांची जमीन त्या पाणंद रस्त्याच्या लगत आहे हे दाखविण्यासाठी तुम्ही काही कागदपत्र दाखल करू शकता का ?

उत्तर- ते कागदपत्र दाखल आहेत.

११. मी त्याबाबत सर्वे क्र.१६ चे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. मी सर्वे क्र.१६ चा ७/१२ उतारा दाखल करू शकतो.

१२. सर्वे क्र.१६ व सर्वे क्र.१७ यामध्ये दक्षिण-उत्तर ओढा आहे हे म्हणणे खरे आहे. त्या ओढयाच्या पूर्वेस- माझी व पश्चिमेस - प्रतिवादींची जमीन आहे हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकत मला माहिती आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस आमच्या भावाच्या जमीनी आहेत. दावा मिळकतीच्या पश्चिमेस - प्रतिवादीची जमीन आहे.

१३. दावा मिळकत माझ्या नावे माझ्या वडिलांनी केलेली आहे. फेरफार

क्र.७१२ व फेरफार क्र.१०३३ हे वडिलोपार्जित जमीनीतील वाटणी आधारे झाले असे दाव्यात नमूद आहे, हे बरोबर आहे. ते फेरफार कोणत्या वर्षी झाले ते मी सांगू शकत नाही.

**प्रतिवादी क्र.१ व २ यांचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD Date: 2025.07.30 17:32:00 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक ३०/०७/२०२५.